महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
चेहेडी (बु),सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१
दुरध्वनी क्रमांक . (०२५३) २४६१४७९
ई मेल ronashik@dtemaharashtra.gov.in सकेतस्थळ - www.dtensk.org

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०२६/ 1680 दिनांक:- 5 AUG 2026

तात्काळ/महत्वाचे परिपत्रक -

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित
पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक अंतर्गत सर्व संस्था.

विषय:- व्यावसायिक अभ्यासक्रमांतील विदयार्थी- विदयार्थीनींना शासनाच्या लागू असलेल्या योजनांनुसार देय लाभांची अंमलबजावणी करण्याबाबत...शैक्षणिक वर्ष २०२६-२७

संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि -४,दि.०८.०७.२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४,दि.१९.०७.२०२४.
४. मा.संचालनालयाचे दि.१२.०८.२०२४ व १६.०७.२०२५ रोजीचे परिपत्रक.
५. मा. संचालनालय यांचे परिपत्रक क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/४४४,दि.०४.०८.२०२६.

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय,शासन अनुदानित, (शासकीय अभिमत विदयापीठासह ) कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत विदयापीठे व स्वंयअर्थसहायित विदयापीठे वगळून) महाविदयालये/शासकीय विदयापीठे/तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोटयातील/ संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय (SEBC) विदयार्थ्यांपैकी, **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत पात्र असलेल्या मुलींना ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमांकरिता आकारण्यात येणारे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून,पात्र असलेल्या मुलींना ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभाऐवजी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या १०० टक्के लाभ लागू करण्यात आलेला आहे. (इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील मुलींना इतर बहुजन विकास विभागाकडून लाभ लागू करण्यात आलेला आहे.)

त्या अनुषंगाने आपणांस या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, शासनाकडून लागू करण्यात आलेल्या योजनेच्या लाभाबाबतची प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी .

१. संस्थांनी त्याच्या संस्थेतील सर्व मुलींना (EBC, EWS, SEBC,OBC ) उपरोक्त शासन निर्णय क्र.२ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलती बाबत अवगत करून अशा पात्र मुलींकडून शिक्षण शुल्क घेण्यात येवू नये.

२. सर्व मुलांना देखील शासन निर्णय क्र.१ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये ५० टक्के सवलती बाबत अवगत करून त्यांच्याकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेण्यात यावे.

३. सामान्य प्रशासन विभाग, दि.२९ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) विदयार्थ्यासाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रदद करण्यात आली असून नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरी सर्व संस्थांनी,सदर प्रवर्गातील विदयार्थ्यांना त्याबाबत तात्काळ कळवून त्याप्रमाणे पात्र विदयार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यात यावे.

४. संस्थांनी प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण (Orientation Programme) कार्यक्रमाच्या वेळी विदयार्थ्यांसाठी असलेल्या शासनाच्या योजनेची माहिती देण्यात यावी.

५. संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये, शासनाच्या योजनेसाठी पात्र असलेल्या उपरोक्त मुलां-मुलींकडून शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या शिक्षण शुल्काच्या लाभाची रक्कम ही प्रवेशाच्या वेळी भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थाविरूध्द कारवाई प्रस्तावित करण्यात करण्यात येईल.

६. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी तसेच,संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विदयार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन,संस्थांनी पात्र विदयार्थ्याचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरावरून **विशेष मोहिम राबवून,** पात्र विदयार्थ्याकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरून घ्यावेत. जेणेकरून कोणताही पात्र विदयार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

७. सर्व शैक्षणिक संस्थांनी संस्थेस लागू असलेल्या सर्व शिष्यवृत्ती योजनांची पात्रता,शिष्यवृत्तीची रक्कम,इतर लाभ इत्यादींची माहिती समाविष्ट असलेला QR कोडयुक्त फलक, संस्थेच्या दर्शनी भागात अनिवार्यपणे प्रदर्शित करावा, तसेच त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

८. सर्व संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची,शासनाची शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी दरम्यान विदयार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

तसेच उपरोक्त सर्व निर्देशांचे पालन न केल्याबाबत कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त झाल्यास संबधित शैक्षणिक संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन प्रकरणाची सखोल पडताळणी करून पडताळणीदरम्यान नियमभंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेस प्रथम समज देऊन, आवश्यकतेनुसार नियमानुसार कडक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव/अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करण्यात येईल. तसेच, शासनाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल व भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारी उभ्दवणार नाहीत, यासाठी आवश्यक ती आपल्या स्तरावरून दक्षता घ्यावी.

(डॉ. गोरक्ष विठोबा गर्जे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक